मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याचे अधिकारी देण्यावाबत.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

वाचा: १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. हिभाप-१९७६-२८, दि. १०.०६.१९७६
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. हिभाप-१०८३/२१७३/वीस, दि. २८.०५.१९८४
३.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. हिभाप-१०८३/१४४८/वीस, दि. ०१.१२.१९८४
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दि. ३०.१२.१९८७
५.महाराष्ट्र शासन राजपत्र,सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना, दि.०७ फेब्रुवारी, २००१
६. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. मभाप-०१/प्र.क्र.६८/२००१/२०-ब, दि. २५.०९.२००१
७.महाराष्ट्र शासन राजपत्र,सामान्य प्रशासन विभाग, दि.०८ मे, २००३
८. ग्राम विकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्रः मचिये १०/२००३/प्र.क्र.४२३०/आस्था-३ दि.२३.०४.२००७
९. मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र. मभाप-२०१६/प्र.क्र.१३/भाषा-२, दि. २४.०५.२०१६
१०. विद्यापीठ परिपत्रक क्र.बीईए/सु.आ.प्र.यो/से.पु.नोंदी/२०२४/१३२९ दिनांक ०२ ऑगस्ट, २०२४

## प्रस्तावना:

कृषि विद्यापीठातील अधिकारी/कर्मचा-यांचे सेवापुस्तकामध्ये अनिवार्य नोंदी घेण्याकरिता संदर्भ क्र.१० नुसार विद्यापीठ परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. उपरोक्त परिपत्रकामध्ये नमुद मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याबाबतचे आदेश निर्गमीत करण्याचे अधिकार, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ३० डिसेंबर, १९८७ नुसार निर्गमीत अधिसुचनेमधील नियम क्र. ४ (४) नुसार नियुक्ती प्राधिकारी किंवा यथास्थिती विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्तनुसार विद्यापीठातील अधिकारी/कर्मचा-यांना मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी म्हणुन "अ" वर्ग कर्मचारी व "इतर अधिकारी" संवर्गातील कर्मचा-यांबाबत मा.कुलगुरू यांना व शिक्षकेत्तर संवर्गातील ("ब" ते "ड' वर्ग) कर्मचा-यांबाबत मा. कुलसचिव यांना प्रदान आहेत.

## आदेश

**जा.क्र. बीईए/आस्था/मराठी हिंदी/सुट/२०२४/1541**

**दि. २७ ऑगस्ट, २०२४**

असे आदेशीत करण्यात येते की, विद्यापीठातील अधिकारी/कर्मचा-यांना मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याबाबतचे आदेश निर्गमीत करून सेवापुस्तकामध्ये नोंदी घेण्यास होणारा विलंब लक्षात घेता मा. कुलगुरू व मा.कुलसचिव यांचे मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याबाबतचे अधिकार, कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मधील कलम ११३ नुसार, संबंधीत नियंत्रण अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

उपरोक्त नुसार सर्व कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांना याव्दारे सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व पात्र अधिकारी/कर्मचा-यांबाबत मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याबाबत कार्यवाही करून नियंत्रण अधिकारी यांच्या स्तरावरून निर्गमीत करण्यात आलेल्या आदेशाच्या नोंदी संबंधीत अधिकारी/कर्मचा-यांच्या मुळ सेवापुस्तकामध्ये घेण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

मा. कुलगुरू महोदयांच्या मंजुरी व आदेशानुसार.

**स्वाक्षरीत/-**
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र. बीईए/आस्था/मराठी हिंदी/सुट/२०२४/1541 दि. २७ ऑगस्ट, २०२४

**प्रतिलीपीः-**

१. अधिष्ठाता (सर्व)..........................................................................................................
२. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)...............................................................................................
३. संचालक संशोधन/विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
४. विभाग प्रमुख (सर्व)........................................................................................................
५. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, (सर्व)........................................................................................
६. सहयोगी प्राध्यापक रा.कृ.सं.प्र. (सर्व).................................................................................
७. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, (सर्व)...................................................................................
८. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, (सर्व).......................................................................
९. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
१०.अधिदान व लेखाधिकारी, अकोला/नागपुर
११. मा. कुलगुरू/कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू/कुलसचिव यांचे माहितीकरीता.
१२. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ संगणक कक्ष, अकोला यांना विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव
१३. ...........................................................................................................................

उपकुलसचिव (आस्था.)
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला